Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 12 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १२ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आजपासून केंद्र शासित प्रदेश दादरा आणि नगर हवेली तसंच दमण आणि दीवच्या तीन दिवसीय दौऱ्यावर आहेत. राष्ट्रपती आज जम्पोर इथं शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट देणार आहेत. तर, उद्या त्या सिलवासा इथल्या नमो मेडिकल एजुकेशन एंड रिसर्च इंस्टीट्यूटला भेट देणार आहे.

****

आरोग्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार असून कोणताही धर्म प्रदूषणाला प्रोत्साहन देत नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. भारतीय संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला प्रदूषणमुक्त वातावरणात जगण्याचा अधिकार आहे, असं न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज यांच्या द्विसदस्यीय पीठाने काल झालेल्या सुनावणीत म्हटलं. तसंच दिवाळीच्या काळात दिल्लीत फटाक्यांवर बंदी आणण्यात अपयश का आलं अशी विचारणा प्रशासनाला करत फटाक्यांवर बंदी आणण्याबाबत तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले.

****

भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी पुण्यात प्रचार सभा घेणार आहेत. तत्पूर्वी आज दुपारी चिमुर आणि नंतर सोलापूर इथंही मोदी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईत दोन सभांना संबोधित करतील. काँग्रेस नेते राहुल गांधी हे चिखली आणि गोंदिया मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचीही आज सोलापूर इथं सभा आहे. भाजपनेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची डहाणू आणि पालघर इथं सभा होणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या महाविकास

आघाडीच्या उमेदवारांसाठी आज नाशिक जिल्ह्यात पाच सभांचं आयोजन करण्या आलं आहे.

****

११ राज्यांतल्या ३३ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आणि केरळमधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी काल संध्याकाळी प्रचार संपला. राजस्थानमध्ये ७, पश्चिम बंगाल ६, आसाम ५, बिहार ४, कर्नाटकात ३ आणि मध्य प्रदेश-सिक्कीममधे प्रत्येकी २ जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. केरळ, छत्तीसगड, गुजरात, मेघालय मधे प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध अंमलबजावणी संस्थांच्या कारवाईत १५ ऑक्टोबरपासून आतापर्यंत ४९३ कोटी ४६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे. तर सी व्हिजिल ऍपवर आतापर्यंत आचारसंहिता भंगाच्या ४ हजार ७११ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४ हजार ६८३ तक्रारी निवडणूक आयोगाने निकाली काढल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कर्यालयानं दिली आहे.

****

मुंबईत नेरूळमध्ये एका घरातून २ कोटी ६० लाखां रुपयांची रोख रक्कम नवी मुंबई पोलिसांनी जप्त केली. कोल्हापूर विधानसभा मतदार संघात आतापर्यंत १० कोटी ७१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी तालुक्यातल्या मांडेसर इथं आचारसंहिता भंग केल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला, हे तिघे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना प्रलोभन देण्यासाठी थैली मध्ये साहित्य वाटप केल्याची चित्रफित निवडणुक आयोगाच्या अधिकार्यांना प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

****

अकोला जिल्ह्यातील मतदान पथकांना मतदान प्रक्रियेसाठी मतदान केंद्रांपर्यंत ने-आण करण्यासाठी १९ आणि २० राज्य नोव्हेंबर रोजी मार्ग परिवहन महामंडळाच्या १२० जादा बसची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ७४१ मतदान केंद्रं आहेत.

****

शेळ्या चारण्यासाठी गेलेल्या सख्या बहीण भावाचा तलावाच्या पाण्यात बुडून करुण अंत झाला. भंडारा जिल्ह्यातील खडकी इथं ही दुर्घटना घडली. प्रेम राजेंद्र वाढवे (९) आणि दिव्या राजेंद्र वाढवे, वय १४ अशी मृत बहीण भावांची नावे आहेत.

****

प्रबोधिनी एकादशी म्हणजेच कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर इथल्या मंदिरात श्री विठ्ठल रखुमाईची शासकीय पूजा पुण्याचे विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते आज पहाटे करण्यात आली. लातूर जिल्ह्यातल्या उदगीरचे बाबूराव सगर आणि त्यांच्या पत्नी सागरबाई यांना महापूजेचा मान मिळाला. सगर दाम्पत्य गेली **14** वर्ष पंढरीची वारी करत आहे. कार्तिकी एकादशी निमित्त पंढरपूरमध्ये तीन लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत.

****

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार, ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. गोव्यात २० नोव्हेंबरपासून हा महोत्सव सुरू होणार असून, २८ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. या महोत्सवासाठी १०१ देशांतून १ हजार ६७६ प्रवेशिका आल्या होत्या, त्यापैकी ८१ देशातले १८० चित्रपट महोत्सवात दाखवले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. भारतीय सिनेमा देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचं योगदान देत असल्याची माहिती माहिती प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी दिली. नव्या चित्रपट निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट नवोदित भारतीय दिग्दर्शक पुरस्कार यंदापासून सुरू होणार आहे.

****